दैनिक
# अक्षराज
मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध
मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com

**आतील पानात...**


- गुढीपाडवा हाच खरा नववर्षारंभ... !
- डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य...
- ड्रायव्हिंग लायसेंसबाबत परिवहन विभागाकडून आरटीओंना कडक सूचना...


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून निघत असते व जे खूप तीव्र देखील असते, त्यात खूपच जास्ती सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...

● वर्ष ०३ रे ● अंक ६५ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, शनिवार, दि.२७ डिसेंबर २०२५ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 65 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Saturday, 27 December 2025 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023












# पुण्याच्या राजकारणात मोठा ट्विस्ट !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून शहरात 'पुणे पॅटर्न'ची म्हणजेच शरद पवार आणि अजित पवार गटाच्या स्थानिक युतीची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, आज दुपारी झालेल्या एका निर्णायक बैठकीत या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्यानंतर अजित पवारांसोबतची बैठक फिस्कटली असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या (मविआ) साथीनेच लढण्याचा निर्णय घेत थेट काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेशी जुळवून घेतले आहे.

**नेमकं काय घडलं बैठकीत?**

आज दुपारी अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यात जागावाटपासाठी एक महत्त्वाची बैठक पार पडली. सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत अजित पवारांच्या गटाकडून शरद पवारांच्या पक्षाला अत्यंत जाचक अटी घालण्यात आल्या. अजितदादांच्या गटाने शरद पवार गटाला पुण्यात केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला. एवढचं नाही या ३५ जागांवरही उमेदवारांनी अजित पवारांच्या 'घड्याळ' या चिन्हावरच निवडणूक लढवावी, अशी अट घालण्यात आली. स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व पणाला लावणारा हा प्रस्ताव शरद पवार गटाला पूर्णपणे अमान्य होता. त्यामुळे ही युती होणे अशक्य असल्याचे स्पष्ट होताच, शरद पवार गटाच्या नेत्यांनी बैठकीतून काढता पाय घेतला.

**हॉटेल शांताईमध्ये 'मविआ'ची संयुक्त बैठक**



अजित पवारांसोबतची बोलणी फिस्कटताच, शरद पवार गटाने वेळ न दवडता थेट महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी संपर्क साधला. पुण्यातील हॉटेल शांताई येथे तातडीने काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांची संयुक्त बैठक सुरू झाली. या बैठकीमुळे पुण्यात आता मविआ विरुद्ध महायुती असाच सामना रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**दिग्गज नेत्यांची उपस्थिती !**

या महत्त्वपूर्ण बैठकीला तिन्ही पक्षांतील प्रमुख स्थानिक नेते उपस्थित आहेत. शरद पवार गटाकडून विशाल तांबे, अंकुश काकडे, मनाली भिलारे, अश्विनी कदम आणि आमदार बापूसाहेब पठारे, तर काँग्रेसकडून अरविंद शिंदे, अभय छाजेड आणि रमेश बागवे आणि ठाकरे गटाकडून (शिवसेना) वसंत मोरे, गजानन थरकुडे आणि संजय मोरे हे बैठकीत हजर आहेत. पुणे महापालिकेत काका-पुतण्या एकत्र येतील या आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांना या घडामोडीमुळे मोठा धक्का बसला आहे. मात्र, घड्याळ चिन्हावर लढण्यास नकार देत शरद पवार गटाने आपण आपल्या भूमिकेशी ठाम असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. आता हॉटेल शांताईमधील या बैठकीतून जागावाटपाचे कोणते नवीन सूत्र ठरते, याकडे लक्ष लागलेले आहे.









# १५० विकेट्स दीप्ती शर्माच्या नावावर...

## अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, तिरुअनंतपुरम :** भारताने तिसऱ्या टी२० सामन्यात श्रीलंकेला ८ गडी राखून पराभूत केलं. या विजयासह पाच सामन्यांची टी२० मालिका ३-० ने खिशात घातली आहे. या सामन्यात दीप्ती शर्मीने विक्रम रचला आहे. श्रीलंकेने तिसऱ्या टी२० सामन्यात ११२ धावा केल्या आणि विजयासाठी ११३ धावा दिल्या. हे आव्हान भारताने १३.२ षटकात २ गडी गमवून गेल्या. या सामन्यात दीप्ती शर्माने फिरकी कौशल्य दाखवले आणि ४ षटकांत फक्त १८ धावांत ३ विकेट्स घेतल्या. दीप्ती शर्माने या विकेटसह टी२० मध्ये १५० विकेट घेतल्या आहेत. अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय गोलंदाज ठरली. जागतिक स्तरावर मेगन शट नंतर ही कामगिरी करणारी ती दुसरी गोलंदाज आहे. शटने १२२ डावांमध्ये १५१ विकेट घेतल्या आणि दीप्तीने१२८ डावात ही कामगिरी केली. दीप्ती



शर्माने या विकेटसह टी२० मध्ये १५० विकेट घेतल्या आहेत. अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय गोलंदाज ठरली. जागतिक स्तरावर मेगन शट नंतर ही कामगिरी करणारी ती दुसरी गोलंदाज आहे. शटने १२२ डावांमध्ये १५१ विकेट घेतल्या आणि दीप्तीने१२८ डावात ही कामगिरी केली. दीप्ती शर्माने सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विकेट्समध्ये ऑस्ट्रेलियाची दिग्गज अष्टपैलू एलिस पेरी हिला मागे टाकले आहे. दीप्तीने २५६ डावांमध्ये ३३३ आंतरराष्ट्रीय विकेट्स घेतल्या आहेत. पेरीच्या नावावर ३३१ विकेट्स आहेत. झुलन गोस्वामीच्या नावावर ३५५ विकेट असून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विकेट्सचा विक्रम आहे. हा विक्रम ही दीप्ती शर्मा लवकरच मोडेल असं दिसत आहे.

# २७७ लोकल पश्चिम रेल्वेवर आज रद्द ! बेस्टच्या जादा बसेस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** कांदिवली - बोरीवली सेक्शनवरील सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण करण्यासाठी पश्चिम रेल्वेने ३० दिवसांचा ब्लॉक घेतला आहे. हा ब्लॉक २०/२१ डिसेंबर २०२५ पासून सुरु झाला असून १८ जानेवारी २०२६ पर्यंत चालणार आहे. याच ब्लॉकमध्ये २७ डिसेंबर (शनिवारी) सकाळी ४ ते रात्री ९ च्या दरम्यान तब्बल २७७ लोकल ट्रेन रद्द होणार आहेत. याशिवाय २६ आणि २७ डिसेंबरच्या मध्यरात्री देखील अनेक लोकल ट्रेन अंशतः रद्द होतील. काही मेल-एक्सप्रेसच्या आगमन आणि निर्गमनच्या वेळेतही बदल होणार आहे. ज्यामुळे प्रवाशांच्या मोठ्या अडचणीचा सामना करावा लागणार आहे. बेस्ट पश्चिम उपनगरात अधिक फेऱ्या चालवण्याच्या निर्णय घेतला आहे. बोरीवली स्थानकात अप आणि डाऊन स्लो मार्गावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (EI) पॅनलच्या कमिशनिंग कार्यासाठी २६ आणि २७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११ वाजता सकाळी ७ वाजेपर्यंत मेजर नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक घेतला जाणार आहे. यात सोबत २६ डिसेंबरच्या रात्री ११ वाजल्यापासून २८ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत कांदिवली आणि दहिसरच्या दरम्यान डाऊन फास्ट मार्गिकेवर वेगावर नियंत्रण लागू होणार आहे. यामुळे काही लोकल ट्रेन रद्द रहातील, तर काही लोकल गोरेगावपर्यंत चालवण्यात येतील अशी माहिती पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क

## ५ दिवसांचा मेगाब्लॉक, मेल-एक्सप्रेसवर ही परिणाम



अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिली आहे.

**मेल-एक्सप्रेसवर ही परिणाम...**

ब्लॉकच्या कालावधी दरम्यान २८ डिसेंबर २०२५ पर्यंत नंदुरबार- बोरीवरी एक्सप्रेस आणि अहमदाबाद एक्सप्रेस बोरीवलीच्या ऐवजी वसईत शॉर्ट टर्मिनेट आणि ओरिजनेट होईल. बोरीवली-वलसाड मेमू ट्रेन डहाणूपासून सुरु होऊन तेथेच समाप्त होईल. तर २८ डिसेंबर रोजी बोरीवली -डहाणू मेमू रद्द राहील. या शिवाय ७ अप आणि १० डाऊन ट्रेन री-शेड्युल असतील, १११ अप आणि ३ डाऊन ट्रेन रेग्युलेट केल्या जातील. तसेच ६ एक्सप्रेस ट्रेन बोरीवली स्थानकावर थांबणार नाहीत.

**ब्लॉकमध्ये काय काम होणार**

या ब्लॉकमध्ये कांदिवली आणि बोरीवली स्थानकावर ट्रॅक स्लीपिंग, अनेक क्रॉसओवर्सचे इन्सर्शन आणि रिमूव्हल, सिग्नलिंग तसेच ओव्हरहेड इक्विपमेंट संबंधित महत्वाची काम केली जातील. या तांत्रिक कामामुळे उपनगरीय, पॅसेंजर आणि मेल-एक्सप्रेस ट्रेनचे संचालन प्रभावित होणार आहे.

**बेस्टच्या जादा बसेस...**

पश्चिम रेल्वेने २६ आणि ३० डिसेंबर दरम्यान बेस्ट प्रशासनाला बोरीवली-चर्चगेट आणि बोरीवली-विरार मार्गावर अतिरिक्त बस चालवण्यास सांगितले आहे. बेस्टने गरजेनुसार जादा बेस्ट चालवण्यात येतील असे उत्तर दिले आहे.

# संपादकीय



## धोकेदायक ऊस वाहतूकीला शिस्त लावा...

उसाच्या ट्रॅक्टरला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. दोन वर्षापूर्वी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे.

काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो.

परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते.

अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच. पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.

## पातळी

निवडणूकीत गाठी
ते खालची पातळी
मोकळे झाले वरिष्ठ
ही तर गाव पातळी

सोन्यासारखीचमक
मुर्ती असून पितळी
पक्षश्रेष्ठीचेकाळीज
आतूनअसे चितळी

मोठ्यांची इलेक्शन
बाकीचे उचले तळी
तहानकार्यकर्त्यांना
आटूनजातात तळी

अंगलट आला डाव
कशीअसे गुपचिळी
कापून टाकी सडके
तयार असते विळी

विजयश्री मिळताचं
टिळामिरवताभाळी
श्रेयश्री देऊन टाकी
बिचारीमंडळीभोळी

प्रयोग गुलामा वरती
जहर उतरवता गळी
सोयी नुसार बदलाव
का पध्दत वेगवेगळी

वेळ असता गरजेची
साधत राही आगळी
बदलून टाकी गंतव्य
मांडतात रांग वेगळी

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# घाट फोडून रस्त्याचे जाळे निर्माण करणारे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर



पाटण तालुक्याचे भाग्यविधाते

तब्बल पन्नासहून अधिक वर्षे ज्यांनी राजकीय, सामाजिक शैक्षणिक आणि पाटण मतदारसंघाचा सार्वत्रिक कायापालट करण्याची तपश्चर्या फळाला नेली. ९० व्या वर्षीही तरूणांना लाजवेल असं उत्तुंग कार्य, सकारात्मक दूरदृष्टी आणि प्रगल्भ विकासाची इच्छाशक्ती याच जोरावर आपलं साम्राज्य उभं केलं. असं आदर्श, चारित्र्यसंपन्न व्यक्तीमत्व म्हणजेच राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचा आज वाढदिवस. या निमित्ताने त्यांच्या आजवरच्या कार्याचा लेखाजोखा

आपल्या सार्वजनिक जीवनात जनहित हेच एकमेव ध्येय ठेवून दादांची आजवरची कारकीर्द यशस्वी व निष्कलंक ठरली. १९८० साली पाटण तालुक्याची राजकीय गरज म्हणून जनतेने दादांना राजकारणात अधिक सक्रिय केले. विकासात्मक अनुशेष भरून काढण्यासाठी जनतेनेच हातात बंडाचा झेंडा घेत स्वप्नपुर्तीसाठी दादांना बळ दिलं आणि १९८३ साली पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर तालुक्यातील खुंटलेला विकासाचा रथ मार्गी लागला. भौगोलिक व नैसर्गिक दृष्टीने अडचणीचा हा तालुका हेच दादांसमोर कडवे आव्हान होते. पाचवीलाच पुजलेला भूकंप, प्रकल्प आणि अतिवृष्टी, महापूर आदी नैसर्गिक आपत्ती उशालाच

होती. सात खोऱ्यात विखुरलेल्या या तालुक्यातील एकमेकांशी संपर्कही तितकाच आव्हानात्मक होता. परंतु,

याच आव्हानांना सकारात्मक दृष्टीने पायबंद घालत दादांनी येथे पहिल्यांदा घाट फोडुन पाटण तालुक्यात रस्त्याचे जाळे निर्माण केले आणि

अग्निदिव्य पार केले. त्यापूर्वी कोयनेच्या माणसाला तारळे तर चाफळच्या माणसाला ढेबेवाडी कुठे आहे याचा थांगपत्ता नव्हता. परंतु दादांनी घाट फोडून, रस्ते, दळणवळण सुरू केले. रस्ते त्यानंतर स्थानिक माणसं एकमेकांना जोडण्याचे पवित्र कार्य केल्याने जनतेने त्यांना 'घाटांचा राजा' हा किताब बहाल केला. तालुका एकमेकांना जोडताना दादांनी पारंपरिक शेतीपद्धती, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने पोटाची भूक भागविण्यासाठी स्थानिक भूमिपुत्रांना मुंबई, पुणे आदी शहरांची वाट धरावी लागायची यासाठी स्थानिक पातळीवर लोकांना रोजगार, व्यवसाय उभा करून

देण्यासाठी विकासात्मक प्रवाहाची कास धरली. सहकारी, शैक्षणिक, खाजगी, पब्लिक लिमिटेड संरख्या, प्रकल्प उभे करून स्थानिक हजारोंना नोकरी, रोजगार व व्यवसाय उभे करून देत अनेकांचे संसार उभे केले. सहकारात

खरेदी-विक्री संघ,पाटण तालुका दुध संघ, शेती उत्पन्न बाजार समिती, पाटण अर्बन बँक , अनेक पतसंस्था उभ्या केल्या. शिक्षणाचे दरवाजे खुले

करताना शिक्षण संस्थेचा गुदमरलेला श्वास मोकळा करत प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, डी. एड., बी. एड. कॉलेज अशी शिक्षणाची गंगसक्रीय केली. सहकारी प्रकल्प उभे करत असताना स्थानिक शेतकऱ्यांना एकत्रीत करून त्यांच्यासाठी कोयना ॲग्रो प्रकल्प उभा केला. यातूनच शेतकऱ्यांच्या फळे, पिकांना योग्य बाजारभाव मिळवून दिला. जागतिक पातळीवर बाजारपेठेत नेवून वेगळा ब्रँड निर्माण केला. सकस मिलक प्रोजेक्ट पाटण तालुका दुध प्रकल्प उभारून स्थानिक शेतकऱ्यांना शेती सोबतच पूरक दुग्ध व्यवसाय मिळवून दिला. शेकडो बेरोजगारांना रोजगार व व्यवसायही उपलब्ध झाला.

तालुक्यातील डोंगर पठारावर साधी

कुसळंही पिकत नव्हती, दारिद्र्य इथं पाचवीलाच पुजलेलं होतं अशा ठिकाणी दादांच्या दूरदृष्टीतून पवनऊर्जेसाठी अशिया खंडातील सर्वोत्तम पवनऊर्जेचा शोध लावत पवारसाहेबांच्या मार्गदर्शनखाली येथे फुकटच्या वाऱ्यावर पवनऊर्जेची विकासात्मक

शेती फुलवली. स्थानिकांच्या कवडीमोल जमिनींना लाखोंचा भाव मिळवून दिला. वाऱ्यालाही कामाला लावत जगभरातील नामाकींत शेकडो कंपन्या आणि त्यांच्या हजारो

पवनचक्यांच्या माध्यमातून येथे अब्जावधींची गुंतवणूक झाली. यातूनच राज्याला पर्यावरण पूरक शेकडो मेगावॉट वीज मिळाली.

शेकडोंच्या संख्येने स्थानिकांसह इतरांनाही येथे रोजगार व्यवसायाची नवनवीन संधी उपलब्ध केली. डोंगर पठारांवरचा लंगोटीतील माणूस पुर्ण पोशाखात आला, झोपडीचा बंगला झाला, हातातील काठीच्या जागी दोन , अथवा दारात चार चाकी गाडी उभी राहीली. स्थानिक रस्ते चकाचक झाले त्याचवेळी आरोग्य, शिक्षण व मुलभूत सुविधा कमालीने चांगल्या मिळाल्या. एवढेच नव्हे तर स्थानिक ग्राम पंचायतींना कर म्हणजे नक्की काय हेच माहिती नव्हते अशा ग्रामपंचायतींना स्वप्नातही पाहिला नसेल असा दरवर्षी कोट्यावधीचा कर मिळू लागल्याने त्यांचे आयुष्यमानच पुर्णपणे बदलून गेले आणि पठारही सार्वत्रिक समृद्ध झाली. यातूनच दादांना पवनऊर्जेचे शिल्पकार हा किताब प्राप्त झाला.

आपल्या शेवटच्या श्वासावरही स्थानिक जनतेचाच अधिकार असून याच जनतेने मला भरभरून दिलेले प्रेम, आशिर्वाद हीच माझी जन्मभराची पुंजी आहे. त्यामुळे त्यांच्या सार्वत्रिक हितासाठी शेवटपर्यंत लढणार हीच दादांची आजही भुमिका पहायला व अनुभवायलाही मिळते.

आपले चारित्र्य, आदर्श, विकासात्मक दूरदृष्टी व प्रगतीशील वाटचाल यावर कायमच खंबीर असलेला हा नेता विजयाने कधी हुरळून गेला नाही अथवा पराभवाने कधी खचून गेला नाही. हाती आलेल

काम हे पवित्र आणि प्रामाणिक भावनेनं तडीस नेण्यासाठी तत्पर असलेल्या विक्रमसिंह दादांच्या याच पावलावर पाऊल ठेवून सत्यजितसिंह पाटणकर यांनीही आपली वाटचाल तशीच ठेवली आहे.

येणाऱ्या काळात स्थानिक जनता अपेक्षित यशाच्या टप्यावर नेवून ठेविलं यात शंकाच नाही. आणि दादांनाही याच प्रामाणिक शुभेच्छाही ठरतील. अशा या उत्तुंग रस्त्याचे जाळे निर्माण करणारे विक्रमसिंह पाटणकर दादांना त्यांच्या ८२ व्या वाढदिवशी तमाम जनतेच्या मनःपूर्वक शुभेच्छा...!

*** शब्दांकन ***
**सुरेश संकपाळ, पाटण**

# गुढीपाडवा हाच खरा नववर्षारंभ !



इंग्रजांनी भारतावर ३५० हुन अधिक वर्षे राज्य केले. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या इंग्रजांना इथल्या वैभवाने, संस्कृतीने आणि विविधतेने भूरळ घातली. भारताकडे पिढीजात असलेले वैभव लुटण्याकरिता आणि त्यावर आपला एकछत्री अंमल निर्माण करण्याकरिता येथील संस्कृतीवर घाला घातला पाहिजे आणि त्याकरिता येथील गुरुकुल पद्धती बंद करून कारकूनी पद्धत रुजवायला पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले. आपले इप्सित साधण्याकरिता त्यांनी पुढे तशी पावले उचलली. मॅकोलेप्रणित शिक्षणप्रणाली देशात रुजू झाली. हळूहळू या शिक्षणप्रणालीने भारताच्या भावी पिढीवरील सुसंस्कार पुसायला आरंभ केला. आज इंग्रज भारतातून जाऊन ७८ वर्षे झाली तरी त्यांनी पेरलेले शिक्षणप्रणाली आपले कार्य करत आहे.

डिसेंबर महिना लागला की शाळा महाविद्यालयांना 'डे'ज वेध लागतात. ३१ डिसेंबर हा त्यापैकीच एक महत्त्वाचा दिवस. वर्षाअखेरीच्या दिवशी सरत्या वर्षाला निरोप देतांना आणि नवीन वर्षाचे स्वागत करतांना मद्यधुंद होऊन स्वैराचाराची परिसीमा गाठणे हा त्यांनीच रुजवलेला परिपाठ आजची स्वतंत्र भारतातील तरूण पिढी इमाने इतबारे राबवत आहे. त्यासाठी शासनाकडूनही मद्यालयांना, पब्स, क्लब आणि बार यांना विशेष सवलत दिली जाते. देशभरात लक्षावधी लीटर मद्य रिचवले जाते. याशिवाय अन्य अंमली पदार्थांचीही मोठ्या प्रमाणात विक्री होते. पाश्चात्त्यांच्या तालावर नशेत झिंगणार्या तरूण तरूणींना यावेळी आपल्या कपड्यांचेही भान रहात नाही. ज्यामुळे छेडछाड आणि विनयभंगाचे प्रकार या रात्री सर्रास घडतात. रात्री दारूच्या नशेत गाडी चालवल्यामुळे अनेक अपघात झाल्याच्या बातम्याही दुसर्या दिवशीच्या दैनिकांत वाचायला मिळतात. मुंबई, दिल्ली सारख्या शहरांमध्ये या रात्री गैरप्रकारांना उधाण आलेले असते.

१ जानेवारी खरेतर ख्रिस्ती नववर्षाचा आरंभ आहे. आजमितीला जगभरात ख्रिस्ती राष्ट्रे बहुसंख्य असल्याने आणि या राष्ट्रांनी जगातील बहुसंख्य देशांवर आपले अधिपत्य गाजवल्याने तेथील संस्कृतीचा पगडा जगभर पहायला मिळतो. त्यामुळे '१ जानेवारी हे जागतिक नववर्ष आहे', असा अपसमज निर्माण झाला आहे; परंतु जगाच्या आराखड्यावर (नकाशावर) आज अशी अनेक राष्ट्रे आहेत, जी या पाश्चात्त्य संस्कृतीला झुगारून स्वराष्ट्राची संस्कृती जतन करून आहेत. त्यांचे नववर्ष १ जानेवारीला चालू होत नाही. भारतीय संस्कृतीतर या सर्वांहून प्राचीन संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीनुसार नववर्षाचा आरंभ गुढीपाडव्याच्या दिवशी होतो. पृथ्वीच्या निर्मितीचा दिवसही हाच आहे. त्यामुळे समस्त भारतियांनी नववर्षाचा आरंभ गुढीपाडव्यापासून करायला हवा; परंतु देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही काही गोष्टीत आपण इंग्रजांच्या पारतंत्र्याचा त्याग केलेला नाही. त्यातील हा एक प्रकार आहे. आपल्याला आपल्या महान अशा संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. पाश्चात्य प्रथा मानवाला नीतीहीन बनवतात, तर हिंदु संस्कृती संयमी आणि सदाचारी बनवते !

भारताचे पहिले पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने मान्यवर शास्त्रज्ञ डॉ. मेघनाद सहा यांच्या अध्यक्षतेखाली कालगणना पुनर्रचना समितीने १९५६ पासून सौर कालगणना सिद्ध केली. २२ मार्च १९५७ पासून ही कालगणना आपल्या देशाची राष्ट्रीय दिनदर्शिका म्हणून अस्तित्वात आली; पण शासकीय उदासीनतेमुळे ही दिनदर्शिका कुठेही वापरली जात नाही. ग्रेगेरियन दिनदर्शिकेचा प्रसार आक्रमकरित्या होत असल्याने ती सर्वत्र वापरली जाते. ग्रेगेरियन दिनदर्शिकेप्रमाणे १ जानेवारीला वर्षाचा आरंभ होतो. वास्तविक त्या दिवशी अवकाशात कोणतीही विशेष घटना होत नसते. मानवी मूल्यांचे संवर्धन करून आपली ऐहिक आणि पारमार्थिक उन्नती कशी करावी हे भारतीय संस्कृती आपल्याला शिकवते. सरत्या वर्षात आपल्याकडून झालेल्या चुका आणि अपराधांचा हिशोब करून नव्या वर्षासाठी नवे संकल्प आणि नवे ध्येय समोर ठेवून नव्या उमेदीने उभारी घेण्यास आरंभ करण्याचा दिवस म्हणजे नववर्षारंभ. हा नववर्षारंभ म्हणजे गुढीपाडवा. इसवी सन १ जानेवारीपासून, आर्थिक वर्ष १ एप्रिलपासून, हिंदु वर्ष चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून, व्यापारी वर्ष कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून, शैक्षणिक वर्ष जूनपासून, सौर वर्ष, चांद्र वर्ष आणि सौर-चांद्र वर्ष (लुनी सोलर) या वर्षांचेही निरनिराळे वर्षारंभ, इतके वर्षारंभ करण्याचे दिवस आहेत. यांत सर्वत्र बारा महिन्यांचेच वर्ष आहे. 'वर्ष बारा महिन्यांचे असावे', असे प्रथम कोणी सांगितले आणि जगाने ते कसे मान्य केले ? याचा प्रथम उद्गाता 'वेद' आहे. वेद हे अतीप्राचीन वा्यमय आहे, याविषयी दुमत नाही. 'द्वादशमासैः संवत्सरः ।' असे वेदात आहे. वेदांनी सांगितले म्हणून ते जगाने मान्य केले. या सर्व वर्षारंभांतील अधिक योग्य प्रारंभदिवस 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' हा आहे. १ जानेवारीला वर्षारंभ का, याला काहीही कारण नाही. कोणीतरी ठरविले आणि ते चालू झाले. याउलट चैत्र शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभ करण्यास नैसर्गिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कारणे आहेत. ज्योतिषशास्त्रानुसार पाडव्याच्या आसपासच सूर्य वसंत- संपातावर येतो (संपात बिंदू म्हणजे क्रांतीवृत्त आणि विषुववृत्त ही दोन वर्तुळे ज्या बिंदूत परस्परांस छेदतात तो बिंदू होय.) आणि वसंत ऋतू सुरू होतो. सर्व ऋतूंत 'कुसुमाकरी वसंत ऋतू ही माझी विभूती आहे', असे भगवंतांनी श्रीमद्भगवद्गीतेत (१०:३५) म्हटले आहे. या वेळी समशीतोष्ण अशी उत्साहवर्धक आणि आल्हाददायक हवा असते. शिशिर ऋतूत झाडांची पाने गळून गेलेली असतात, तर पाडव्याच्या सुमारास झाडांना नवी पालवी येत असते. वृक्षवल्ली टवटवीत दिसतात. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली, म्हणजे सत्ययुगाला सुरुवात झाली, तो दिवस म्हणजे गुढीपाडव्याचा असल्याने तो सृष्टीचाही आरंभ दिन आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री मद्याच्या नशेत झिंगून ख्रिस्ती नववर्षाचे स्वागत करणारी आजची पिढी सनातन भारतीय संस्कृतीचे हे महत्व केव्हा जाणणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे केवळ पदे, अधिकार किंवा यशस्वी कारकीर्द यापुरती मर्यादित राहत नाहीत, तर ती आपल्या विचारांनी, कार्याने आणि मूल्यांनी संपूर्ण समाजाला नवी दिशा देतात. अशीच एक तेजस्वी, दूरदर्शी आणि समाजाभिमुख व्यक्ती म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख होय. २७ डिसेंबर हा दिवस त्यांच्या जयंतीचा; केवळ एका राजकीय नेत्याची आठवण म्हणून नव्हे, तर भारतीय शेती, ग्रामीण समाज, शिक्षण व्यवस्था आणि शोषित घटकांच्या सशक्तीकरणासाठी आयुष्य वेचलेल्या एका महान समाजसुधारकाच्या कार्याचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य हे बहुआयामी, दीर्घकालीन परिणाम घडवणारे आणि आजही तितकेच सुसंगत असे आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म विदर्भातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी ग्रामीण जीवनातील कष्ट, दारिद्र्य, अज्ञान आणि सामाजिक विषमतेचा अनुभव घेतला. या अनुभवांनी त्यांच्या मनात केवळ व्यक्तिगत प्रगतीची महत्त्वाकांक्षा निर्माण केली नाही, तर समाजासाठी काहीतरी करावे, शेतकरी आणि ग्रामीण जनता शिक्षित, संघटित आणि सक्षम व्हावी, अशी तीव्र जाणीव रुजवली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवता येते, हा विश्वास त्यांच्या जीवनकार्याचा केंद्रबिंदू ठरला.

शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत मूलभूत आणि दूरगामी होते. विदर्भातील शेतकरी, कामगार आणि गरीब वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी शिक्षणसंस्थांची उभारणी केली. अमरावती येथे स्थापन झालेली श्री शिवाजी शिक्षण संस्था ही केवळ एक शैक्षणिक संस्था नव्हती, तर ती ग्रामीण समाजाच्या बौद्धिक आणि सामाजिक उन्नतीचे केंद्र बनली. त्या काळात उच्च शिक्षण हे शहरकेंद्रित आणि अभिजन वर्गापुरते मर्यादित होते; अशा परिस्थितीत ग्रामीण भागात शिक्षणाचे दालन खुले करणे हे मोठे धाडस होते. डॉ. देशमुख यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानले आणि ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य समजून घेताना त्यांच्या शेतकरी प्रश्नांवरील भूमिकेचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. स्वतः शेतकरी कुटुंबातून आलेल्या या नेत्याला शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आकडेवारीपुरत्या माहीत नव्हत्या, तर त्या त्यांच्या जीवनानुभवाचा भाग होत्या. जमीनधारणा, सिंचनाची कमतरता, सावकारशाहीचे जाचक बंधन, बाजारव्यवस्थेतील शोषण आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी कसा पिचत जातो, हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ आर्थिक नसून सामाजिक आणि मानसिकही आहेत, ही जाणीव त्यांच्या कार्यात सातत्याने दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख भारताचे कृषिमंत्री झाले, तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देताना शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान, अनुभव आणि स्वाभिमान अबाधित राहावा, याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. सिंचन प्रकल्प, कृषी संशोधन, सहकार चळवळ आणि कृषी शिक्षण यांना चालना देण्यामागे त्यांचा सामाजिक दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्यासाठी शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नव्हती, तर ती ग्रामीण संस्कृतीचा आणि समाजजीवनाचा आधारस्तंभ होती. डॉ. देशमुख यांचे सामाजिक कार्य केवळ शिक्षण आणि शेतीपुरते मर्यादित नव्हते. समाजातील दुर्बल, मागास आणि वंचित घटकांचे जीवनमान उंचावणे, हा त्यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू होता. जातीभेद, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध त्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतीने संघर्ष केला. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समता साध्य होऊ शकते, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या संस्थांमधून निर्माण झालेले विद्यार्थी केवळ नोकरी मिळवणारे कर्मचारी न बनता सामाजिक भान असलेले, जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. राजकीय जीवनात असूनही डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सत्तेचा उपयोग समाजसेवेसाठी कसा करता येतो, याचा आदर्श घालून दिला. राजकारण म्हणजे केवळ सत्तास्पर्धा नसून समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्याचे साधन आहे, हा विचार त्यांच्या कार्यातून सातत्याने प्रतिबिंबित होतो. त्यांनी संसदेत आणि मंत्रिमंडळात शेतकरी, ग्रामीण जनता आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित मुद्दे प्रभावीपणे मांडले. त्यांची भाषणे केवळ राजकीय घोषणांपुरती मर्यादित न राहता समाजशास्त्रीय जाणिवांनी परिपूर्ण असत.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहकार चळवळीबद्दलची त्यांची भूमिका. सहकार ही ग्रामीण विकासाची प्रभावी साधनं ठरू शकतात, हा त्यांचा ठाम विश्वास होता. शेतकरी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवू शकतात, आर्थिक स्वावलंबन साधू शकतात आणि शोषणाविरुद्ध उभे राहू शकतात, यासाठी सहकार चळवळीला बळ देणे आवश्यक आहे, असे ते मानत. सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश मिळावा, त्यांना योग्य दर मिळावा आणि सावकारशाहीपासून मुक्ती मिळावी, हा त्यांच्या प्रयत्नांचा गाभा होता. सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने पाहता, डॉ. देशमुख यांची विचारधारा अत्यंत प्रगत आणि मानवतावादी होती. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अन्यायकारक परंपरांविरुद्ध उघडपणे भूमिका घेतली. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकबुद्धी यांच्याशिवाय समाज प्रगती करू शकत नाही, हा विचार त्यांनी समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः ग्रामीण भागात महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक स्थान उंचावणे, यासाठी त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

आजच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, शिक्षणातील असमानता आणि वाढती सामाजिक दरी या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा वेळी डॉ. देशमुख यांचा विचार आणि कार्य आपल्याला दिशा देऊ शकते. शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून, शेतीला सन्मानाचे स्थान देऊन आणि सामाजिक न्यायाचा आग्रह धरूनच आपण समताधिष्ठित समाजाची निर्मिती करू शकतो, हे त्यांच्या जीवनकार्याचे सार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करताना केवळ त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा अंगीकार करणे, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आजच्या समाजातील प्रश्नांवर उपाय शोधणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. शिक्षणाच्या माध्यमातून समाज सशक्त करणे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि राजकारणाला समाजसेवेचे साधन बनवणे, या त्रिसूत्रीवर आधारित त्यांचे सामाजिक कार्य आजही आपल्यासाठी दीपस्तंभासारखे आहे.

अशा या महान समाजसुधारकाच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा स्मरणोत्सव साजरा करताना, आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. आपण त्यांच्या विचारांना कितपत पुढे नेत आहोत? आपल्या कृतीतून समाजातील दुर्बल घटकांसाठी काहीतरी करत आहोत का? डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन हे केवळ इतिहासातील एक सुवर्णपान नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा देणारे जिवंत मूल्य आहे. त्यांच्या सामाजिक कार्याला वंदन करून, त्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्याची हीच खरी वेळ आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

# डिजीटल होर्डींग, सोशल मिडीया, सेल्फी बूथ अशा विविध माध्यमांतून नवी मुंबईकरांना मतदानाचे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५- २६ ही दि.१५ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होत असून यामध्ये नवी मुंबईकर मतदारांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध माध्यमांचा वापर करून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.




सध्या डिजीटल माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या फेसबुक, इन्स्टा, एक्स, व्हॉट्सॲप चॅनल अशा समाज माध्यमांवरून विविध ग्राफिक्स व रिल्सद्वारे १५ जानेवारी रोजी प्रत्येक नवी मुंबईकर मतदाराने सकाळी ७.३० ते सायं. ५.३० वा. या वेळेत मतदान करून आपला मतदानाचा हक्क कर्तव्यभावनेने बजावावा आणि संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार अभिमानाने मिरवावा असे आवाहन करण्यात येत आहे. यासोबतच शहरात ठिकठिकाणी असलेल्या डिजीटल बॅनर्सवर मतदानाविषयीच्या आवाहनाचे ग्राफिक्स नागरिकांच्या येता-जाता दृष्टीक्षेपास पडावेत. अशा प्रकारे झळकवण्यात आलेले असून मतदान करण्याविषयी प्रचार-प्रसार करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे मुख्यालय तसेच विभाग कार्यालये आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची विभागांतील कार्यालये याठिकाणी निवडणूक मतदानाविषयी सेल्फी बूथ ठेवण्यात आलेले आहेत. तसेच विविध मॉल्स, सर्व डी मार्ट, नाट्यगृह आणि वंडर्स पार्क, ज्वेल ऑफ नवी मुंबई, सेंट्रल पार्क सारखी उद्याने, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, वाशी – नेरूळ– ऐरोली रूग्णालये अशा वर्दळीच्या ठिकाणी सेल्फी बूथ ठेवण्यात आले आहेत. त्यावर असलेल्या 'मी मतदान करणार' या संदेशाच्या माध्यमातून नागरिक आपण मतदान करणार हा निर्धार व्यक्त करीत आहेत शिवाय इतरांनीही मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करीत आहेत.

विविध सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित केलेल्या या सेल्फी बूथ सोबत नागरिकांनी आपले छायाचित्र काढावे आणि आपल्या फेसबुक, इन्स्टा, एक्स, व्हॉट्सॲप स्टेटस अशा सोशल माध्यमांवर अपलोड करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# मुंबई उपनगर सब ज्युनिअर राज्यस्तरीय तायक्वॉदो स्पर्धेसाठी संघ जाहीर

## जिल्हा स्पर्धा उत्साहात; राज्य स्पर्धेत करणार प्रतिनिधित्व

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२६, मुंबई :** तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई या अधिकृत संघटनेशी संलग्न असलेल्या तायक्वॉदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेच्या वतीने २४वी जिल्हास्तरीय तायक्वॉदो स्पर्धा आयोजित करून त्यामधील सुवर्णपदक विजेते खेळाडू राज्य तायक्वॉदो स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

तायक्वॉदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई तर्फे दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल, विलेपार्ले (पूर्व) येथे जिल्हास्तरीय स्पर्धा उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विलेपार्ले पूर्व या संस्थेचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू,तसेच तायक्वॉदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे पदाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.उद्घाटनप्रसंगी सर्व मान्यवरांनी



खेळाडूंना शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र,मुंबई या अधिकृत संघटनेचे अध्यक्ष अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पाठारे, खजिनदार व्यंकटेश कररा, सचिव सुभाष पाटील यांच्या मार्गदर्नाखाली या अधिकृत स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. सर्व निवड झालेल्या खेळाडूंचे जिल्हा संघटनेच्या वतीने अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

**निवड झालेला पुमसे संघसब ज्युनिअर**

**वैयक्तिक :-** इशित गोलांबडे, निधी भंडारी

पेअर (सब ज्युनिअर) :- इशित गोलांबडे, गौरी तोरसकर

ग्रुप (सब ज्युनिअर मुली) :- अक्षरा बोंबले, अंतरा बोंबले, ज्ञानेश्वरी थिटे,

ग्रुप (सब ज्युनिअर मुले) :- हर्षित शेंडे,विहान आखाडे, पुनित वराडकर

क्योरेगी संघ मुली :- काव्या वांगुळे,नितिका बाबर,मनस्वी रसम,अंशिता धाबे,रुही विचारे,अनन्या कामत,रितेशा यादव, श्रुती कोटकर,प्रांजल कंवल, रुही फराटे,श्रावणी लांडगे

क्योरेगी संघ मुले :- उत्कर्ष पडिलकर, श्रवण मोहिते, समर धामकार, यथार्थ खोपकर, इशित गोलांबडे, प्रतिक गरसिया, विहान इंगळे, कियांश मंचेकर, स्वराज पाडेकर, द्रोणा दळवी, पुनित वराडकर, सुयश सिंह, शुभम इंदोरे

पुमसे प्रशिक्षक :- सारा येवलेपुमसे व्यवस्थापक :- साक्षी माने

क्युरोगी प्रशिक्षक :- कल्पेश गोलांबडे, पुनम येवले

संघ व्यवस्थापक :- ओम यादव

# जुईनगर प्रभाग क्रमांक २२ मधून तनुजा मढवी चे वाढते प्रस्थ

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२६, जुईनगर (नवी मुंबई) :** जुईनगर प्रभाग क्रमांक २२ मधून ४ माजी नगरसेवक इच्छुक आहेत असे चित्र असतानाच जुईनगरच्या माजी नगरसेविका तनुजा मढवी यांचे पारडे वजनी होताना दिसत आहे. त्यांचा अनधिकृत बॅनर बाजीवर जास्त भर नसला तरी तनुजा मढवी यांचे बॅनर मतदारांच्या मनात आहेत असे काही मतदार बोलताना दिसतात. अश्यातच तनुजा मढवी यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्याने त्यांना पाठिंबा वाढत चालल्याचे चित्र आहे. काही नगरसेवक त्यांच्या वाढत्या प्रस्थाचा धसका घेऊन त्यांना उमेदवारी देऊच नका असे



पक्षाला सांगताना दिसतात. तसेच हेच लोक आपल्या कुटुंबातील लोकांनाच सर्व तिकीट देण्यात यावे असा आग्रह धरून शिंदे शिवसेनेला वेठीस धरण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे.

माजी नगरसेविका तनुजा मढवी यांची कार्यसम्राट म्हणून ख्याती आहे. त्यांनी कमी वेळेत मोठी मोठी नागरी कामे केली आहेत. त्या कोणा विरुद्ध फारशी प्रतिक्रिया देत नाहीत पण नागरी कामात त्या अग्रेसर आल्याचे बोलले जाते. त्यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या की मी ज्या पक्षात गेले आहे त्याचे नाव उज्वल करण्याचे काम माझे कार्यकर्ते व मी करणारच आहे. माझ्या विषयी कोण काय बोलतंय ते पक्ष बघून घेईलच. पण कोणी पक्षा पेक्षा मोठा असू शकत नाही. व पक्षाला वेठीस धरणे फार चुकीचे आहे. मीच सर्व काही बघू शकतो असा गर्व कोणी करू नये शेवटी मतदार आपला मायबाप असतो. त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही याचे भान सर्वांनी ठेवणे गरजेचे आहे.

मी कधीही कोणा उमेदवारा विषयी बदनामी कारक बोलत नाही, माझ्या बाबतीत कोणी बोलत असतील व मी सक्षम नाही असे कोणाला वाटत असेल तर त्यांना त्यांची उमेदवारी लाख लाभो असे उद्गार माजी नगर सेविका तनुजा मढवी यांनी काढले. येती निवडणूक गोंधळाची आहे पक्षीय चुरशीची आहे. सर्वांचीच परीक्षा आहे. अजून उमेदवार निश्चित होत नाहीत व युती आघाडीचे देखील काही होत नाही नामनिर्देशन फॉर्म भरण्यासाठी वेळ कमी असताना सर्वांना चिंता लागली आहे की वेळेवर फॉर्म भरणे होईल की नाही?

# रेल्वे कारशेड सुविधांसाठी कळवा मुंब्रा रेल्वे प्रवासी संघर्ष समिती आक्रमक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, कळवा (ठाणे) :** अनधिकृत प्रवासी वाहतुकीचा मुद्दा पुढे करून मध्य रेल्वेने कळव्यातील गेली कित्तेक वर्षे सुरू असलेली कारशेड प्रवासी वाहतूक बंद करण्याचे ठरविले आहे.कारशेड मधून होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला आळा बसावा म्हणून कळव्यात रेल्वे ट्रॅकच्या दोन्ही बाजूने संरक्षक भिंत बांधून कळवा पश्चिमेकडे कारशेडच्या वरून पादचारी पुल निर्माण होत आहे.

वास्तविक गेल्या काही वर्षात कळव्याची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याने आणि अपुऱ्या सोयी सुविधांअभावी कळवा स्टेशन मधून सकाळच्या वेळी मुंबईकडे प्रवास करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. तसेच यावेळी कल्याणकडून येणाऱ्या सर्वच लोकल खचाखच भरून येत असल्याने कळवेकरांना लोकल मिळणे खूप कठीण जाते. दरवाजात लटकून प्रवास केल्याने कळवा ठाणे दरम्यान असलेल्या खाडीत पडून आजवर कित्तेक प्रवाशांचा मृत्यू देखील झालेला आहे. म्हणूनच नाईलाजाने स्वतः चा जीव धोक्यात घालून कळव्यातील बहुसंख्य नागरिक कारशेडमधून सुटणाऱ्या गाड्यांनी रोज मुंबईकडे प्रवास करतात. यात प्रामुख्याने, नोकरदार वर्ग, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांचा समावेश असतो.

परंतु आता रेल्वे प्रशासनाने अनधिकृत प्रवासी वाहतुकीचा मुद्दा पुढे करून कळवेकरांची ही सुविधा बंद करण्याचा घाट घातला आहे.

दरम्यान मध्य रेल्वेचा हा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी आता कळवा मुंब्रा प्रवासी संघर्ष समिती मैदानात उतरली असून रेल्वे प्रशासनाच्या या अन्यायकारक निर्णयाविरोधात कळव्यात ठिकठिकाणी जनजागृती अभियान राबविले जात आहे. रेल्वे प्रवासी संघर्ष समितीच्या या अभियानाला कळव्यातील नागरिकांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद




दिला असून मोठ्या संख्येने कळवेकर या अभियानात सामील होत असून मध्य रेल्वे प्रशासनाच्या विरोधात आपला रोष प्रगट करीत आहेत.

दरम्यान या अभियानाला अधिक बळकटी मिळावी म्हणून रेल्वे प्रवासी सुरक्षा समितीने रेल्वे महाप्रबंधक यांची भेट घेऊन त्यांना कळवेकरांच्या कारशेड बाबतच्या मागणीसह इतरही काही मूलभूत मागण्यांचे निवेदन दिले आहे. तसेच कळव्यातील बहुसंख्य नगरसेवकांना देखील रीतसर पत्र देऊन या अभियानात सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कळव्यातील ज्येष्ठ नगरसेवक मिलिंद पाटील तथा मंदार केणी यांनी याबाबत खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करून कारशेड सुविधा बंद करण्यापूर्वी कळवेकरांना आधी होम प्लॅटफॉर्म मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे.

दरम्यान दिवसेंदिवस कळवा मुंब्रा रेल्वे प्रवासी संघर्ष समितीच्या या कळवा कारशेड बाबतच्या अभियानाला नागरिकांचा भरघोस पाठिंबा मिळत असून रेल्वे प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे समितीचे संयोजक प्रथमेश उपरकर यांनी सांगितले आहे.

# ड्रायविंग लायसेंसबाबत परिवहन विभागाकडून आरटीओंना कडक सूचना




**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२६, नेरूळ (नवी मुंबई) :** ड्रायव्हिंग लायसन्सबाबत अत्यंत महत्त्वाची बातमी, परिवहन विभागाच्या ठढज ला कडक सूचना वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मिळविण्याची प्रक्रिया आता अधिक कडक आणि पारदर्शक होणार आहे. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर चालक प्रशिक्षण आणि परवाना चाचणीतीला त्रुटी दूर करून गुणवत्तापूर्ण चालक तयार करण्यावर परिवहन विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. पक्क्या लायसन्ससाठी ऑनलाइन व नोंदवणे सक्तीचे करण्यात आले आहे. या खेरीज, प्रत्येक कार्यालयासाठी चाचणीसाठी लागणारा वेळ अधिकारी उपस्थिती, कागदपत्र तपासणी आणि सीसीटीव्ही निगराणीचे कडक नियम घालण्यात आले आहेत. रस्त्यांवर होणारे ८० टक्के अपघाता हे वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे होत असल्याचे दिसून आले आहे. अपघात कमी करण्यासाठी उत्तम चालक निर्माणा करणे गरजेचे आहे. त्यासाठी वाहना चालविण्याच्या चाचणी अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी नुकतेच एक परिपत्रक जारी केले आहे..परिवहन विभागाकडून 'ऑटोमेटेड ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक' प्रकल्प सुरू आहे. पण, तो पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या चाचणी मार्गावर 'सीसीटीव्ही'च्या निगराणीखालीच वाहन चालवण्याची चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे. संपूर्ण रेकॉर्डिंग सुरक्षित ठेवून तपासणी समितीला उपलब्ध करून देणे कार्यालयांसाठी अनिवार्य असेल. त्यासाठी एक नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना सर्व आरटीओंना दिल्या आहेत.

परिवहन विभागाच्या या नव्या निर्णयामुळे परवाना चाचणी अधिक काटेकोर, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे.वाहन चालवण्याच्या चाचणीत अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी काटेकोर लक्ष ठेवावे. तसेच, परीक्षा उत्तीर्ण झालेल्या एकूण अजपैकि ५ टक्के अर्जदारांची पुन्हा चाचणी घेण्यात यावी. त्याचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या शेवटी सादर करावा लागणार आहे. त्यामुळे पक्का वाहन परवाना देण्यासाठी कोटेकोरपणे लक्ष दिले जाणार आहे.

पक्क्या लायसन्ससाठी चाचणी देणाऱ्या सर्व अर्जदारांना ऑनलाइन अपॉइंटमेंट घेणे अनिवार्य. एका दिवशी किती वाहनांची चाचणी घ्यायची, कोणता वाहनप्रकार किती वेळात तपासायचा, याचे वेळापत्रक कार्यालयांना बंधनकारक केले आहे.ज्या अधिकाऱ्यांची चाचणीसाठी नियुक्ती आहे, त्या सर्वांनी मैदानावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. चाचणी झाल्यानंतर अर्जाची नोंद रजिस्टरमध्ये स्वतंत्रपणे केली जाणार आहे. कोणताही अर्ज तपासणीविना पुढे जाणार नाही.परवाना प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा 'सेवा हमी' अंतर्गत वेळेत पूर्ण करणे संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीचे. विलंब किंवा अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई होणारवाहन चाचणी मार्गावर 'सीसीटीव्ही' निगराणी ठेवणे बंधनकारक. चाचणीच्या एकूण प्रक्रियेचे रेकॉर्डिंग सुरक्षित ठेवणे आणि तपासणी समितीला उपलब्ध करून देणे हे कार्यालयांचे कर्तव्य असेल. वाहन तपासणीदरम्यान त्रुटी, अव्यवस्था किंवा गैरव्यवहार आढळल्यास तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्याचे ही आदेश आहेत.

वाहन निरीक्षक, सहायक निरीक्षक किंवा कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रक्रिया बिघडवली, अपॉइंटमेंटऐवजी थेट चाचण्या घेतल्या किंवा गैरव्यवहार केला तर कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.

# मनपा निवडणूक : उत्पादन शुल्क, परिवहन व वाहतूक विभागाची बैठक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, पनवेल :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी. यासाठी शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर महापालिका मुख्यालयात उत्पादन शुल्क, परिवहन विभाग व वाहतूक विभागाची बैठक घेण्यात आली. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकित तीनही विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



आदर्श आचारसंहितेचे पालन करताना निवडणूक रॅली, प्रचार मिरवणुकी दरम्यान वाहनांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याविषयीच्या सूचना परिवहन विभागास देण्यात आल्या. प्रचार रॅलीचे मार्गाविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती करून घेणे, वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी करणे, तपासणी नाक्यावरती संशयास्पद वाहनांची असून चौकशी करण्याबाबत या बैठकीत सूचना देण्यात आल्या.

उत्पादन शुल्क विभागास भरारी पथकांच्या सहाय्याने चेकपोस्ट नाक्यांवरती बनावट दारू, अवैध वस्तू यांच्यावर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. पथकांच्या सहाय्याने आदर्श आचारसंहिताचे पालन करताना विविध तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याविषयी सूचना दिल्या. तसेच प्रभाग निहाय भरारी पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

पोलीस वाहतूक विभागास सूचना देताना सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाजवळील वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधून वाहतूक कोंडी होणार नाही यादृष्टीने बॅरिकेटिंग करणे, पार्किंगचे नियोजन करण्याविषयक सूचना देण्यात आल्या. सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांना एकमेकांच्या संपर्कात राहून नियोजनपूर्वक काम करण्याविषयी सांगितले.

एक खिडकी योजनेबाबत माहिती देताना शासनाच्या संबंधित विभागाच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या. निवडणूकविषयक सर्व कामे जसे की सर्व प्रकारची माहिती, परवाना देणे, प्रमाणपत्र तात्काळ एक खिडकीच्या माध्यमातून देण्याविषयीच्या सूचना या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी यावेळी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सूचना दिल्या.

# खामसवाडी येथे जिल्हा परिषद व पंचायत समिति उमेदवार संदर्भात निरिक्षकांची बैठक

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२६, धाराशिव :** कळंब तालुक्यातील खामसवाडी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या निवडणूकां करिता पक्ष निरीक्षकांच्या बैठकीत जिल्हा परिषद गटातील व गणातील स्थानिक उमेदवाराचा कसा असावा या बाबत भारतीय जनता पार्टीच्या वतीने पक्ष निरिक्षकांच्या वतीने दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी खामसवाडी जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील इच्छुक उमेदवारांचे नावे व चर्चा करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषद व पंचायत समिती गणाचे निरीक्षक म्हणून मधुकर मामा तावडे व बालाजी मडके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये खामसवाडी, गोविंदपुर माळकरंजा व खामसवाडी या गावातील कार्यकर्त्यांची व गण व गटप्रमुख प्रमुख यांची बैठक घेण्यात आली. यावेळी भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी खामसवाडी, गोविंदपुर, माळकरंजा, देवळाली, ढोराळा, बोरगाव, वाठवाडा, व वडगाव या गावातील कार्यकर्त्यांनी या वरील गावापैकीच स्थानिक उमेदवारांना उमेदवारी द्यावी. अशी प्रमुख मागणी निरीक्षकाकडे मांडली.

तर एक मुखाने गटातील व गणातील स्थानिक रहिवाशीच उमेदवार म्हणून देण्यासाठी वरिष्ठांना कळवावे असे एकमताने ठरले.

> **खामसवाडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार म्हणून विश्वास कोकणे यांना उमेदवारी देण्याबाबत प्रभावीपणे एकमत झाल्याचे समजते. तर पंचायत समिती गणातून दैवशाला संजय पाटील, किरण पाटील, विजय शिंदे, नितीन बंडगर, इत्यादी नावे चर्चेत आहेत. तरी सदरील उमेदवारांना वरीष्ठांणी उमेदवारी द्यावी अशी मागणी ग्रामस्थ व पक्षातील कार्यकर्ते यांच्याकडुन होत आहे.**

यावेळी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संजय पाटील, वैभव मुंडे, ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील, सादिक सय्यद, भाजपचे कार्यकर्ते अनिल शेळके, महेश शेळके, नाना भुतेकर, दिलीप शेळके, निसार मुंडे, सावता माळी,बलराम कुलकर्णी, विनोद माने यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते होते.

# क्रीडासत्रातून निर्माण होते सांघिकतेची भावना - सहाय्यक आयुक्त सूर्यवंशी

## मनपा शालेय क्रीडासत्राला सुरवात; ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** मानसिक व शारिरीक स्वास्थ्यासाठी मैदानी खेळ आवश्यक आहेत. जिंकलो तर यश कसे पचवावे व हरलो तर नवीन उमेदीने कसे उभे राहावे. हे खेळ आपल्याला शिकवते. सहनशीलता. शिस्त, धैर्य, आत्मविश्वास, खेळात वाद झाला तर संयमाने कसा सोडवावा हे सगळे गुण या क्रीडासत्रातून निर्माण होऊन सांघिकतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागेल अशी आशा मनपा सहाय्यक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

कोहिनूर मैदानात चंद्रपूर महानगरपालिका शाळांच्या २०२५-२६ क्रीडासत्राला २४ डिसेंबर रोजी सहायक आयुक्त शुभांगी सर्यवंशी यांच्या हस्ते उद्घाटन करुन सुरवात करण्यात आली. याप्रसंगी सहायक आयुक्त संतोष गर्गेलवार, प्रशासन अधिकारी सुनील आत्राम व्यासपीठावर उपस्थित होते.

क्रीडासत्रात मनपाच्ये २६ शाळांचे ६०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ३ दिवसीय क्रीडासत्रात खो-खो, कबड्डी, गोळै फेक, रीले रेस, लांब उडी, वैयक्तिक कौशल्य इत्यादी विविध मैदानी खेळ खेळले जाणार आहेत. ३ दिवस विद्यार्थ्यांच्या भोजनाची तसेच मध्यान्हात दुध देण्याची व्यवस्था मनपातर्फे येणार आहे. विद्यार्थ्यांचे सामूहिक संचलन, स्वागत नृत्य, शो ड्रील हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. स्वागत नृत्य भारतरत्न भीमराव



आंबेडकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच लोकमान्य टिळक कन्या शाळा, रयतवारी कॉलरी मराठी शाळा, पी.एम. शहीद भगतसिंग शाळा, पी. एम. सावित्रीबाई फुले या शाळांनी आकर्षक शोड्रील सादर केल्या. अध्यक्ष शुभांगी सूर्यवंशी यांनी खेळाडूंना शपथ दिली. तसेच प्रमुख अतिथी संतोष गर्गेलवार यांनी पंचांना शपथ दिली. कार्यक्रमाचे संचालन स्वाती बेतावार केंद्र समन्वयक आणि भूषण बूरटे सहयक शिक्षक यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुनील आत्राम प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर यांनी केले.

# सलमान खान ६० व्या वाढदिवसाची तयारी सुरू असताना सापडला कायदेशीर अडचणीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६ :** बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी ६० वा वाढदिवस साजरा करणार आहे. त्यापूर्वी तो एका कायदेशीर अडचणीत सापडला आहे. 'राजश्री पान मसाला' या उत्पादना संदर्भातील हे प्रकरण आहे.

या पान मसालाच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीशी संबंधित एका प्रकरणात शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी राजस्थानमधील कोटा याठिकाणच्या ग्राहक न्यायालयाने कठोर भूमिका घेतली असून न्यायालयाने अभिनेत्याला प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

२० जानेवारी रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे. केवळ दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीपुरते हे प्रकरण मर्यादित राहिले नसून बनावट स्वाक्षरीशी संबंधित आहेत. बनावट स्वाक्षरीचे आरोप झाल्याने, या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. PTI ने याविषयी वृत्त दिले आहे.

याआधी ९ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत, तक्रारदार आणि राजस्थान उच्च न्यायालयाचे वकील इंद्र मोहन सिंग यांनी असा दावा केला आहे की, या प्रकरणाशी संबंधित न्यायालयात सादर केलेल्या पॉवर ऑफ ॲटर्नी आणि सलमानकडून देण्यात आलेल्या उत्तरावर जी स्वाक्षरी



आहे, ती सलमान खानचीनसून बनावट आहे. इंद्र मोहन सिंग हे एक भाजपा नेतेही आहे. त्यांनी असा युक्तिवाद केला की त्यांनी जोधपूर तुरुंग आणि इतर न्यायालयांमधून सलमानची मूळ स्वाक्षरी असलेली कागदपत्रे मिळवली आहेत आणि या कागदपत्रांवरी स्वाक्षरी कोटा न्यायालयात सादर केलेल्या स्वाक्षरीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. न्यायालयाने हा आरोप गांभीर्याने घेतला असून शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सलमानच्या स्वाक्षरीची FSL (फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी) तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले.

**काय आहे पान मसाला जाहिरातीचा वाद...?**

हे स्वाक्षरी प्रकरण राजश्री पान मसालाच्या जाहिरातीशी संबंधित आहे. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी या जाहिरातीसंदर्भात करण्यात आलेल्या तक्रारीत असा आरोप करण्यात आला होता की, ही कंपनी आणि सलमान खान 'वेलची आणि केशर' या अन्नपदार्थांचा प्रचार करून तरुणांना दिशाभूल करत आहेत. वकील इंद्र मोहन सिंह यांनी असा सवाल उपस्थित केला होता की, जर बाजार भावानुसार, केशरची किंमत ४ लाख रुपये प्रति किलो आहे, तर ५ रुपयांना पाऊचमध्ये केशर कसे उपलब्ध होऊ शकते? त्यांनी असा आरोप केला की अशा जाहिराती तरुणांना कर्करोगासारख्या घातक आजारांकडे ढकलत आहेत आणि सलमान खान केवळ पैशासाठी अशा उत्पादनाचा ब्रँड ॲम्बेसेडर बनला आहे.

आता एफएसएल अहवालात अभिनेत्याच्या स्वाक्षरीमध्ये अनियमितता आढळली तर सलमान खानसाठी नवीन संकट निर्माण होऊ शकते. सलमान खान कोर्टात हजर राहिल्यानंतर २० जानेवारी रोजी मिळणाऱ्या अपडेटची प्रतीक्षा आहे.

# मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या प्रयत्नांना यश

## एकेरी स्वतंत्र मार्गिका रस्ता व कमानी पुलाच्या कामाला सुरुवात; काम पूर्ण झाल्यानंतर पर्यटकांना आणि नागरिकांना मिळणार दिलासा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथील वेण्णा लेक येथील मुख्य प्रवेशद्वारावर पर्यटन होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी एकेरी स्वतंत्र मार्गिका (बायपास) रस्ता व कमानी पुलाच्या उभारणीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या प्रयत्नाने वन विभागाने मंजूरी दिली असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.महाबळेश्वरमधील वेण्णा लेक परिसरातील नेहमीच वाहतूक कोंडी होते. ही कोंडी सोडवण्यासाठी बायपास रस्ता आणि कमानी पुलाच्या बांधकामाला अंतिम मंजुरी मिळाली असून, यामुळे पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे आणि वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

वेण्णा लेक परिसरात पर्यटकांची प्रचंड गर्दी होते. ज्यामुळे वाहतूक कोंडीची मोठी





समस्या निर्माण होते. ही समस्या सोडवण्यासाठी वेण्णा लेकपासून एक बायपास रस्ता तयार करण्याची योजना आहे, जो धनगरवाडीमार्गे मुख्य रस्त्याला जोडला जाईल.

या बायपास मार्गावरील मुख्य रस्ता आणि कमानी पुलाच्या बांधकामातील सर्व अडथळे दूर झाले आहेत आणि शासनाने या प्रकल्पाला अंतिम मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे वेण्णा लेक परिसरातील वाहतूक कोंडी कमी होईल आणि पर्यटकांना मोठा दिलासा मिळेल. हे काम पूर्ण झाल्यानंतर, उन्हाळ्यातील आणि सुट्ट्यांमधील गर्दीच्या काळात वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे.

# धनोजे कुणबी समाज म्हाडा कॉलनी नवीन चंद्रपूर विभागाची उपशाखा कार्यकारणी गठीत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज चंद्रपूर जिल्हा अंतर्गत धनोजे कुणबी समाजाची गाव/ वॉर्ड तिथे उपशाखा उपक्रमा अंतर्गत म्हाडा कॉलनी नवीन चंद्रपूर विभागाची वॉर्डातील जेष्ठ समाज बांधव, समाजातील प्रतिष्ठित नागरिक, आजी माजी लोकप्रतिनिधी, कर्मचारी आणि धनोजे कुणबी समाज चंद्रपूरचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर, उपाध्यक्ष संजय ढवस, कोषाध्यक्ष सुधाकर काकडे, सदस्य रविंद्र झाडे, ॲड.देवा पाचभाई, भाऊराव झाडे, कोमल मोहितकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. धनोजे कुणबी समाजाचे एकत्रिकरण करून समाजाला सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच आर्थिक सर्वच क्षेत्रात सक्षम कसे करता येईल यावर सर्वांनी आपले मनोगत व्यक्त



केले. तसेच धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर यांनी समाजाची पतसंस्था आणि त्याचे उद्दिष्ट समाज बांधवाना पटवून सांगितले व समाज सदस्य नोंदणीत सहभागी होण्याचे आव्हान केले.

त्यानंतर धनोजे कुणबी म्हाडा विभागाची कार्यकारणी पुढील प्रमाणे गठीत करण्यात आली त्यामध्ये अध्यक्षपदी गजानन मत्ते, उपाध्यक्ष अरविंद उलमाले, अजय चिकटे, महेश मालेकर सचिव अविनाश बदखल, सहसचिव राजेंद्र ठाकरे, कोषाध्यक्ष राकेश पिंपळशेंडे, संघटक सुनील चिकटे, प्रसिद्धी देवानंद चटप, सल्लगार शेखर गाडगे, घानोडे, भास्कर विधाते, उपरे यांची निवड करण्यात आली.

यानंतर चंद्रपूर शहर आणि तालुक्यामध्ये प्रत्येक गावात धनोजे कुणबी समाजाची उपशाखा स्थापन करून समाजाला एकत्रित करण्याकरिता मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातील आणि त्याकरिता सर्वच प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगरचे उपाध्यक्ष संजय ढवस यांनी प्रास्ताविक भाषणामधून व्यक्त केले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या

## गाव विकास समितीचे अध्यक्ष गोताड यांची मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, रत्नागिरी :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका निवडणूक आयोगाने 'ईव्हीएम' (एतच्) ऐवजी बॅलेट पेपरवर (मतपत्रिका) घ्याव्यात, अशी आग्रही मागणी गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी आपले मत मांडताना निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेवर भर दिला आहे.

ईव्हीएमच्या वापरासाठी अनेकदा 'वेळेची बचत' हे कारण दिले जाते. मात्र, उदय गोताड यांनी हा दावा खोडून



काढला आहे. ते म्हणाले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे मतदारसंघ हे आकाराने आणि मतसंख्येने तुलनेने लहान असतात. त्यामुळे मतपत्रिकेवर मतदान झाले तरी मतमोजणीसाठी फारसा वेळ लागणार नाही. परिणामी, वेळेचे कारण पुढे करून ईव्हीएमचा आग्रह धरणे चुकीचे आहे. गेल्या काही काळापासून ईव्हीएम मशीनच्या विश्वासार्हतेवर विविध स्तरांतून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

जनमानसात असलेला हा संशय दूर करण्यासाठी बॅलेट पेपर हाच उत्तम पर्याय असल्याचे गोताड यांनी नमूद केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जर मतपत्रिकेवर झाल्या, तर मतदारांचा लोकशाहीवरील विश्वास अधिक वृद्धिंगत होईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

# मनसे, शिवसेना ठाकरे गट युती ठरली; पण महायुतीचे राजकारण पुन्हा उघडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे, ठाकरे गट आणि मित्रपक्षांमध्ये जागा वाटपावर जवळपास अंतिम एकमत झाले असून, दोन दिवसांत उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे. एकूण १२२ जागांपैकी मनसे ५० ते ५५ जागांवर निवडणूक लढवणार असून उर्वरित जागा ठाकरे गट व शिवसेना-मित्रपक्षांमध्ये ॲडजस्ट केल्या जाणार असल्याचे मनसे नेते राजू पाटील यांनी स्पष्ट केले.

मनसे शिवसेना ठाकरे गट युतीचे चित्र स्पष्ट होत असतानाच महायुतीबाबत राजू पाटील यांनी थेट शंका व्यक्त करत सत्ताधारी भाजप शिंदे गटावर जोरदार टीका केली. महायुती होईल, असे वाटत नाही. हे नेहमीचं नाटक आहे. आधी भांडायचं, चर्चा चालवायची आणि शेवटी वेगळं व्हायचं. २९ तारखेपर्यंत चर्चा आणि ३० तारखेला युती तुटलेली दिसेल, असा ठाम अंदाज त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, २७ गाव संघर्ष




समितीने निवडणुकीला विरोध दर्शविल्याने काही प्रभागांमध्ये त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता असून, या भूमिकेला मनसेचा जाहीर पाठिंबा असल्याचे राजू पाटील यांनी स्पष्ट केले. २७ गावांवर सातत्याने अन्याय झाला आहे. २०१९ मध्ये मी स्वतः संघर्ष समितीच्या पाठिंब्यावर उभा राहिलो होतो. २७ गावे बाहेर काढण्याचा मुद्दा होता, मात्र राजकारण आडवे आले. १८ गावे बाहेर गेली, ९ गावे अजूनही पालिकेत अडकली आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

भाजपवर टीका करताना राजू पाटील म्हणाले की, मागील निवडणुकीत गाव बाहेर काढू, साडेसहा हजारांचे पॅकेज देऊ, अशी आश्वासने देत भाजपने लोकांच्या भावना वापरल्या. आता संघर्ष समिती त्या भूलथापांना बळी पडणार नाही, अशी अपेक्षा आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव न देण्यात आल्याबद्दलही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दोन्ही सभागृहांत ठराव होऊनही नाव देण्यात येत नाही, ही राज्य सरकारची उदासीनता असल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडे मनसे-ठाकरे गटाची युती ठाम होत असताना, दुसरीकडे महायुतीतील गोंधळ अंतर्गत दबाव आणि २७ गावांचा असंतोष या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरणार असल्याचे संकेत या विधानांतून स्पष्ट होत आहेत.

# ८४ पेक्षा जास्त जागा आणि ५ वर्षे महापौरपद द्या, तरच युती करणार - माजी आमदार नरेंद्र पवार

**अक्षराज ; विनोद वास्कर**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** कल्याण डोंबिवलीमध्ये भाजपने केलेल्या सर्व्हेमध्ये एकट्या भाजपला ८० हून जागा मिळणार असल्याचे दिसत असून आम्हाला ८४ हून अधिक जागा मिळाल्या तरच आम्ही युतीसाठी तयार आहोत, अन्यथा युती होणार नाही अशा शब्दांत माजी आमदार आणि महायुतीच्या समन्वय समितीचे सदस्य नरेंद्र पवार यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलताना पवार यांनी भाजपाच्या मागण्यांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे सांगत एकप्रकारे दंड थोपटले आहेत.

निवडणुका होऊन आता १० वर्षे झाली आहेत, आमचे असो की त्यांचे सगळेच नगरसेवक माजी झाले असून अपवाद वगळता कोणालाही प्रभागात ओळखणार नाही अशी परिस्थिती आहे. ही वस्तुस्थिती पाहता शून्यातून



सुरूवात करणे आवश्यक असून या १० वर्षांत राजकीय गणिते मोठ्या प्रमाणावर बदलली असल्याचे पवार यांनी सांगितले. तसेच याआधीच्या निवडणुकीत शिवसेनेचे नगरसेवक निवडून आले तेव्हा शिवसेना एकत्र होती. मात्र आता शिवसेनेचे दोन भाग झाले असून भाजप एकसंघच आहे. आणि या ५ वर्षांत भाजपची ताकद कल्याण डोंबिवलीमध्ये वाढलेली असल्याचे सांगत शिवसेनेचा जागावाटपाचा फॉर्म्युला मान्य नसून भाजपने मांडलेला फॉर्मुला हा प्रॅक्टिकल असल्याचे ते म्हणाले.

भाजपने केलेल्या सर्वे मध्ये ८० पेक्षा जास्त जागा भाजपाला मिळत असल्याने ८४ पेक्षा जास्त जागा आम्हाला मिळाल्याच पाहिजेत. तर गेल्यावेळी आमच्या हक्काचे महापौरपद आम्हाला मिळाले नाही, सभागृह नेता ही शिवसेनेचाच राहिला आणि आम्हाला उपमहापौरपद देण्यात आले होते. परंतु आता त्या पद्धतीने चालणार नसून आम्ही दिलेल्या अटींवरच युती होईल अशा स्पष्ट शब्दांत पवार यांनी आपली भूमिका मांडली. तर युती होऊ नये ही आमच्या पक्षाप्रमाणे त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची ही इच्छा आहे. या निष्ठावंत कार्यकर्त्यांची समजूत काढणे आमच्याप्रमाणे शिवसेनेलाही सोपे नाहीये. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी युतीसंदर्भातील निर्णय हा स्थानिक पातळीवर घेण्याचे जाहीर केले असून स्थानिक पातळीवर युतीसाठी सकारात्मक भूमिका नसल्याने युतीच्या नेत्यांनी त्याचा आदर केला पाहिजे अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचेही नरेंद्र पवार यांनी यावेळी सांगितले.

# भाऊराव महल्ले यांचे निधन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** खापरखेडा येथील रहिवासी व भाजपा नागपूर जिल्हा ओबीसी आघाडीचे महासचिव विलास महल्ले यांचे वडील व वेकोलि सेवानिवृत्त भाऊराव



लक्ष्मण महल्ले यांचे शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, ३ मुली व नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता कोराडी- खापरखेडा देवी मंदिर रोड कोलार घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# विंग ग्रामपंचायत राज्याला दिशा दर्शक ठरेल - अनिल वाघमारे

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२६, विंग (सातारा) :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विंग ग्रामपंचायत यांच्या विद्यमाने भव्य नारी शक्ती/ अहिल्याबाई होळकर पुरस्कार वितरण/ आजी माजी सैनिक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे विंग ता.खंडाळा ग्रामपंचायतच्या वतीने नारीशक्ती पुरस्कार सोहळा तसेच राजमाता अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार सन २०२५ तसेच आजी - माजी सैनिक सन्मान सोहळा करण्याचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शेतीनिष्ठ शेतकरी यांचा देखील सत्कार सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याचबरोबर ग्रामपंचायतने एका अनाथ मुलाचे संगोपन व त्याचे शिक्षण करण्याच्या उपक्रमामध्ये कु.स्वराज जालिंदर चव्हाण या सातवी मधील मुलाचे दहावी पर्यंतच्या शिक्षणाचा खर्च ग्रामपंचायतने करण्याचे ठरविले आहे.

या कार्यक्रमासाठी खंडाळा तालुक्याचे गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, सहाय्यक गट विकास अधिकारी प्रकाश बोंबले, विस्ताराधिकारी सुनील बोडरे, उमेद अभियान तालुका प्रमुख चव्हाण, प्रवीण खुडे, उपस्थित होते. तसेच गोदरेज अँड बॉईज कंपनीचे प्लांट हेड सुनील बेलोसे, मानसी राऊत, रियटर इंडिया कंपनीच्या एच.आर.मोरे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या वेळी माजी सैनिकांचे प्रतिनिधी म्हणून बबन दिनकर महांगरे अध्यक्ष माजी सैनिक संघ खंडाळा तसेच सिद्धू नेवसे उपस्थित होते. यावेळी श्रीमती महिला तसेच गावातील विविध विभागात काम करीत असणाऱ्या कर्तुत्वान महिलांचा, अंगणवाडी सेविकां, मदतनीस, आशा सेविका, शिक्षिका, मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. त्यानिमित्ताने महिला नारी शक्ती मेळाव्याचे नियोजन करण्यात आले होते. या सर्व महिलांना गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांच्या हस्ते भव्य नारीशक्ती/अहिल्याबाई होळकर पुरस्कार/ देऊन सन्मानित करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मोकाशी यांनी केले तर कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत विंग चे सरपंच स्वप्नील तळेकर, उपसरपंच सौ पुनम तळेकर, सर्व ग्रा. पं. सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मण पडळकर ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या

# शिंगोरी येथे तुळजाभवानी मूर्ती स्थापना दिवस साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या पारशिवनी तालुक्यातील शिंगोरी येथे येवले कुटुंबियाकडून हुबेहुब तुळजापूरच्या भवानी मातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा वर्धापन दिन मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत मोठ्या उत्साहात नुकताच साजरा करण्यात आला.



भवानी माता ही कुणबी समाजाची तसेच अनेक समुदायांची कुळमाता असल्याने परिसरातील लोक कुटुंबासह या मंदिरात मातेच्या दर्शनासाठी व पूजा अर्चना करण्यासाठी येतात. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुजारी सुरेश येवले यांच्या आईचे अभिषेक, महिलांचे भजन, सामूहिक हवन, महाआरती करण्यात आली. यावेळी भाविकांनी व परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश येवले, नाना येवले, समीर येवले, अनिकेत येवले, विनोद येवले, अभिषेक रांगणकर, मंगेश जुमले, आयुष रांगणकर, स्मिता जैन, अनिता येवले, जया रांगणकर, रंजना भुरसे, वंदना चुन्ने, स्वाती नागपुरे आदींनी परिश्रम घेतले.

# के.रामलू शाळेत अय्यप्पा स्वामीची महापडीपूजा संपन्न



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२६, नांदेड :** कुंडलवाडी येथील के.रामलू शाळेत दुपारी अय्यप्पा स्वामीची महापडीपूजा अत्यंत श्रद्धा व भक्तिमय वातावरणात पार पडली. रमाणाप्रसाद गुरूस्वामी यांच्या मुखारविंदातून वैदिक मंत्रोच्चार, पारंपरिक विधी व शिस्तबद्ध पूजाविधीमुळे संपूर्ण शाळा व परिसर अध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला होता. पडीपूजे दरम्यान अय्यप्पा स्वामींचा अभिषेक, विशेष पूजन व आरती करण्यात आली. स्वामीये शरणम अय्यप्पा या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.यावेळी उपस्थित भाविकांनी मनोभावे दर्शन घेत कुटुंबीयांच्या सुख समृद्धी, आरोग्य व शांततेसाठी प्रार्थना केली.त्याच निमित्ताने या ठिकाणी सर्वपक्षीय नवनिर्वाचित उमेदवारांचा यथोचित सत्कार तथा सन्मान करण्यात आला यावेळी भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, अपक्ष हे सर्वपक्षीय उमेदवार उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष पदाचे उमेदवार प्रेरणाताई गजानन कोटलावार उपस्थित होते. या धार्मिक कार्यक्रमास लक्ष्मणराव ठक्कुरवार, साईनाथ उत्तरवार, डॉ. लखमपुरे व तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, अय्यप्पा स्वामींचे भक्त व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी भक्तीभावाने सहभाग नोंदवत धार्मिक शिस्त पाळली. कार्यक्रमाच्या शेवटी दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महापडीपूजेमुळे परिसरात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून धार्मिक परंपरेचे जतन करणारा हा सोहळा सर्व उपस्थितांसाठी समाधानकारक व प्रेरणादायी ठरला.

# विद्यार्थ्यांचे अतोनात हाल; गुहागर - नागझरी एस.टी बस सेवा तात्काळ सुरु करा



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, गुहागर (ठाणे) :** गुहागर तालुक्यातील एसटी सेवेचा बोजवारा उडाला असून शालेय विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत आहेत. एसटी सेवेच्या गैरसोयीबाबत ग्रामस्थांच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत, त्यात आता नागझरी गावच्या विद्यार्थ्यांना भेडसावणारी समस्या पुढे आली असून सदर बाबत गुहागर मनसेने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ - आगार व्यवस्थापक गुहागर यांच्याकडे दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी नागझरी येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी एस टी चालू करण्यासाठी निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, नागझरी गावातील एस.टी बस सेवा कोरोना काळापासून बंद असून शालेय विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे, गावातील जवळ जवळ २० विद्यार्थी पालशेत व गुहागर या ठिकाणी महाविद्यालयात जाणारे आहेत. शाळेच्या वेळेत एस.टी सेवा बंद असल्यामुळे वयोवृद्ध नागरीक, आजारी रुग्ण, विद्यार्थी व ग्रामस्थ यांची गैरसोय होत असल्याचे निवेदनात म्हटले असून विद्यार्थ्यांच्या शाळा व हायस्कूलच्या नियोजित वेळेत नागझरी एस.टी फेऱ्या लवकरात लवकर सुरु करण्यात याव्यात अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कोंड कारुळ जि.प. गट उप तालुकाध्यक्ष प्रसाद विखारे यांनी केली आहे. निवेदन देताना विभाग अध्यक्ष सचिन सैतवडेकर, पालशेत शाखा अध्यक्ष अजित आग्रे, गौरव शिरगावकर, सुधीर दाते, दिलीप दाते आदी मनसे सैनिक यांच्यासह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.